महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार



छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : ३२४ वे | दिनांक : २५/११/२०२६ | वार : बुधवार

शंभराव्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी शरणकुमार लिंबाळे यांची निवड



पुणे : येथे होणाऱ्या शंभराव्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी आज मंगळवार, 24 नोव्हेंबर रोजी ज्येष्ठ साहित्यिक शरणकुमार लिंबाळे यांची निवड झाली. प्रकाशक आणि लेखक बाबा भांडे यांचे नावही चर्चेत होते. मात्र, अखेर लिंबाळे यांच्या नावावर शिक्कामोर्तब झाले. महाराष्ट्र साहित्य परिषदेचे अध्यक्ष योगेश सोमण, उपाध्यक्ष पुरुषोत्तम सप्रे, प्रमुख कार्यवाह स्वाती महाळंक, कोषाध्यक्ष प्रदीप निफाडकर यांच्या उपस्थित झालेल्या बैठकीत हा निर्णय झाला.दुष्काळामुळे संमेलन साधेपणाने घ्यावे याबाबतही यावेळी चर्चा झाली. 'अक्करमाशी' या आत्मकथनाने डॉ. लिंबाळे यांना मराठी साहित्यविश्वात स्वतंत्र ओळख मिळवून दिली. 'द आऊटकास्ट : अक्करमाशी' या नावाने त्याचा इंग्रजी अनुवाद प्रसिद्ध झाला आणि या साहित्यकृतीचा विविध विद्यापीठांच्या अभ्यासक्रमात सहभाग झाला आहे. 'सनातन', 'उपल्या', 'हिंदू', 'रामराज्य', 'गावकुसाबाहेरील कथा', 'दलित पँथर', 'दलित साहित्याचे सौंदर्यशास्त्र' अशा विविध साहित्यकृतींमधून त्यांनी जात, अस्मिता, सामाजिक विषमता, इतिहास आणि माणसाच्या जगण्याचे प्रश्न मांडले आहेत.अनुभवातून आलेले लेखन आणि सामाजिक वास्तवाकडे पाहण्याची चिकित्सक दृष्टी ही त्यांच्या साहित्याची महत्त्वाची वैशिष्ट्ये आहेत. त्यांची चाळीसपेक्षा अधिक पुस्तके प्रकाशित झाली असून दिलीपराज प्रकाशनतर्फे त्यांचे 'दलित फाईल्स' हे पुस्तक प्रकाशित करण्यात आले आहे. चाळीसच्यावर पुस्तकांचा साहित्यप्रवास असलेल्या डॉ. लिंबाळे यांच्या साहित्यकृतींचे हिंदी, इंग्रजीसह मल्याळम, तमिळ, कन्नड, पंजाबी, गुजराती आणि इतर भारतीय भाषांमध्ये अनुवाद झालेत.2011 मध्ये 12व्या अखिल भारतीय आंबेडकरवादी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद आणि 2019 मध्ये प्रा. रा. ग. जाधव साहित्यसाधना पुरस्कार त्यांना लाभला. तसेच 'सनातन' या कादंबरीसाठी 2020 सालचा के. के. बिर्ला फाऊंडेशनचा मिळालेला सरस्वती सन्मान हा त्यांच्या साहित्यिक कारकिर्दीतील अत्यंत महत्त्वाचा गौरव ठरला आहे.सातारा येथे 99 वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन 1 ते 4 जानेवारी 2026 दरम्यान झाले होते. या संमेलनाच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ साहित्यिक विश्वास पाटील होते. आता लिंबाळे हे मावळते अध्यक्ष पाटील यांच्याकडून सूत्रे हाती घेतील. सातारा येथील संमेलनात मराठी साहित्य महामंडळाचे कार्याध्यक्ष विनोद कुलकर्णी यांच्यावर काळा बुक्का टाकून हल्ला करण्याचा प्रयत्न झाला होता. त्यामुळे हे संमेलन चांगलेच चर्चेत आले होते.

खरातच्या आश्रमासाठी पाच कोटींचा सरकारी निधी- रवींद्र धंगेकरांचा गंभीर आरोप



पुणे : खरात प्रकरणात खरातसाठी छत्री धरल्यामुळे रूपाली चाकणकर यांना महिला आयोगाच्या अध्यक्षपदावरून हटविण्यात आले, मग खरातचे पाय धरणारे राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्याबाबतीत वेगळा न्याय का? असा सवाल शिवसेना नेते रवींद्र धंगेकर यांनी एक सोशल मिडीया पोस्ट करत केला आहे. रवींद्र धंगेकर म्हणाले की, देवेंद्रजी, न्यायाची भूमिका घेताना व्यक्ती पाहून निर्णय होऊ नये. रूपाली चाकणकर यांच्याबाबतीत जो निकष लावला, तोच चंद्रकांतदादा पाटील यांच्याबाबतीतही लावला पाहिजे, असे धंगेकरांनी म्हटले आहे. रवींद्र धंगेकर म्हणाले की, खरात प्रकरणात रुपाली चाकणकर यांना महिना आयोगाचे पद सोडावे लागले. त्यांची अनेक तपास यंत्रणाच्या मार्फत चौकशी झाली. याचा अहवाल जनतेसमोर का आला नाही? हा गंभीर विषय आहे. खरातच्या आश्रमांसाठी सरकारी ५ कोटी रुपयांचा निधी दिलेला आहे त्याचे पुरावे माझ्याकडे आहेत. उच्च तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील हे खरात यांचे पाय धरताना दिसत आहेत. अनेक मंत्री म्हणतात चंद्रकांत पाटील यांचा मोठा त्याग आहे, तो खरातच्या पाया पडताना दिसतो आहे.रवींद्र धंगेकर म्हणाले की, चंद्रकांत पाटील हे काही खरातला एकदा नाही भेटले नाही ते अनेकदा खरातला भेटले आहेत. भोंदूकडे चंद्रकांत पाटील कशाला गेले तर तंत्र-मंत्र करण्यासाठीच गेले असतील. शाहु-फुले-आंबेडकरांच्या विचाराच्या महाराष्ट्रामध्ये चुकीच्या पद्धतीने पाऊलं पडत असतील त्यांना जर सरकार पाठिशी घालत असेल. प्रामुख्याने मुख्यमंत्री जर त्यांना पाठिशी घालत असतील तर ते चुकीचे आहे त्यांचा राजीनामा घेतला पाहिजे.

शरद पवार यांच्या निवृत्तीची चर्चा करणे अयोग्य, मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांचे वक्तव्य



नागपूर : राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार गट) पक्षाचे अध्यक्ष शरद पवार येत्या १२ डिसेंबर रोजी आपल्या वाढदिवसानिमित्त राजकारणातून निवृत्ती जाहीर करणार असल्याच्या चर्चांना राज्यात मोठे उधाण आले आहे. या चर्चांवर राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंगळवारी (२४ नोव्हेंबर) नागपूर येथे माध्यमांशी संवाद साधताना अत्यंत स्पष्ट प्रतिक्रिया दिली आहे. "शरद पवार साहेबांना उत्तम आरोग्य लाभावे, हीच आमची सर्वांची सदिच्छा आहे. पवार साहेब आजही अत्यंत सक्रिय असून मी त्यांना खूप जवळून पाहिले आहे. ते सातत्याने वेगवेगळ्या प्रकल्पांमध्ये आणि समाजोपयोगी कामांमध्ये रुची घेत असतात; त्यामुळे त्यांच्या निवृत्तीची चर्चा करणे योग्य नाही. ते आपल्या आयुष्यात कधीही थांबणार नाहीत आणि काही ना काही सकारात्मक काम करतच राहतील, असा मला विश्वास आहे," असे फडणवीस यांनी स्पष्ट केले. यासोबतच त्यांनी कोयनेचे पाणी मुंबईला वळवण्याचा वाद, आगामी अधिवेशनातील परीक्षा सुधारणा विधेयक आणि ड्रॅगन पॅलेस मेट्रो स्टेशनच्या नामांतराबाबत महत्त्वाची माहिती दिली. शरद पवार आजही सक्रिय; अशा चर्चा करण्याचे कारण नाही शरद पवार १२ डिसेंबरला निवृत्तीची घोषणा करतील आणि एनडीए प्रवेशाबाबत निर्णय होईल, या राजकीय वर्तुळातील चर्चांवर मुख्यमंत्री फडणवीस यांनी पूर्णविराम देण्याचा प्रयत्न केला. शरद पवार साहेबांची कार्यशैली आणि कामाचा उत्साह मी जवळून पाहिला आहे. ते सतत नवनवीन प्रकल्पांत कार्यरत असतात. अशा कार्यशील नेत्याच्या निवृत्तीची चर्चा करणे योग्य नसून, अशा प्रकारच्या चर्चा करण्याचे कोणतेही कारण नाही, असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. कोयनेच्या ६० ते ८० टीएमसी पाण्यावरून विनाकारण वाद नको कोयनेचे पाणी मुंबईला वळवण्याच्या प्रस्तावावरून महायुतीतील काही नेत्यांनी आणि पश्चिम महाराष्ट्रातील लोकप्रतिनिधींनी केलेल्या विरोधाचा मुख्यमंत्र्यांनी समाचार घेतला. ते म्हणाले, पहिली गोष्ट म्हणजे कोयनेचे पाणी आत्ताच वळवण्याचा विषय नाही, तर त्यावर केवळ प्राथमिक अभ्यास सुरू आहे. कोणताही अभ्यास न करता अनेक लोक या विषयावर बोलत आहेत. समुद्रात वाहून जाणाऱ्या ६० ते ८० टीएमसी पाण्याचा वापर कोयना प्रकल्प उभारल्यापासून गेल्या ५० ते ६० वर्षांत वीजनिर्मिती केल्यानंतर सोडले जाणारे सुमारे ६० ते ८० टीएमसी पाणी थेट समुद्राला जाऊन मिळते. या पाण्याचा एक थेंबही सिंचनासाठी (इरिगेशन) वापरला जात नाही. हेच वाया जाणारे पाणी उचलून मुंबईला देता येईल का, याचा अभ्यास सुरू आहे; जेणेकरून कोकणातील प्रकल्पांवरचा ताण कमी होऊन मुंबई स्वयंपूर्ण होईल. कोकण व दुष्काळी भागांचाही विचार कोकणातील लोकप्रतिनिधींनी या पाण्यात कोकणाचाही विचार व्हावा अशी मागणी केली असून, तोही विचार नक्कीच केला जाईल. तसेच, सातारा, सांगली आणि सोलापूरच्या दुष्काळी भागात आपण पाणी नेले आहे आणि यापुढेही नेणारच आहोत; त्यामुळे कोणाच्याही हक्काचे पाणी पळवले जाणार नाही, विनाकारण या टप्प्यावर वाद निर्माण करू नये, असे आवाहन फडणवीस यांनी केले. परीक्षा गैरप्रकारांना चाप बसवण्यासाठी कठोर कायदा राज्यातील स्पर्धा परीक्षा आणि भरती प्रक्रियेतील पारदर्शकता वाढवण्यासाठी राज्य सरकारने मोठे पाऊल उचलले असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. माजी अधिकारी व्ही. राधा यांच्या अध्यक्षतेखालील आणि राज्याचे पोलीस महासंचालक (डीजी) यांचा समावेश असलेल्या समितीने आपला अहवाल सरकारला सादर केला आहे. परीक्षा पद्धती अधिक पारदर्शी करणे, परीक्षा केंद्रे निश्चित करणे आणि दोषींना १० वर्षांपर्यंतच्या शिक्षेची तरतूद असलेला अधिक कडक कायदा करण्याचा सरकारचा मानस असून, येत्या हिवाळी अधिवेशनातच हे परीक्षा सुधारणा विधेयक मंजूर करण्याचा प्रयत्न राहील. विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्क परत मिळणार परीक्षेबाबत विद्यार्थ्यांमध्ये गांभीर्य (सिरियसनेस) राहावे यासाठी अर्ज करताना शुल्क आकारले जाईल; मात्र संबंधित विद्यार्थ्याने प्रत्यक्षात परीक्षा दिल्यानंतर हे शुल्क त्याला परत केले जाईल, जेणेकरून कोणत्याही विद्यार्थ्यावर आर्थिक बोजा पडू नये, अशी महत्त्वाची शिफारस समितीने केली आहे. कामठीतील मेट्रो स्थानकाचे नाव 'ड्रॅगन पॅलेस टेम्पल मेट्रो स्टेशन' होणार! भारत-जपान मैत्रीचे प्रतीक असलेल्या नागपूर (कामठी) येथील ड्रॅगन पॅलेस टेम्पलच्या २७ व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित तीन दिवसीय सोहळ्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सहभागी झाले होते.

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार २५ नोव्हेंबर २०२६

मराठा विद्यार्थ्यांना ओबीसीं प्रमाणे शुल्क सवलती सुरु!

मुंबई (प्रतिनिधी) : राज्यातील चारही कृषी विद्यापीठांच्या अंतर्गत येणाऱ्या कृषी व कृषी संलग्न महाविद्यालयां मध्येइतर मागासवर्गीय (ओबीसी) प्रवर्गातील विद्यार्थ्यां प्रमाणेच मराठा समाजातील पात्र विद्यार्थ्यां नाही शैक्षणिक शुल्क,परीक्षा शुल्क व अन्य शुल्कां मध्ये सवलती देण्यास राज्य शासनाने मंजुरी दिलीआहे. डॉ राजेंद्र दाते पाटील यांच्या सोळा दिवसाच्या अन्न त्याग आंदोलनाचे यश असल्याचे स्पष्ट झाले असुन त्यांची या उपोषणातील महत्वाची मागणी होती कि, मराठा समाजाला ओबीसी प्रमाणे शैक्षणिक व नोकरी विषयक सवलती देतांना जी आर मध्ये दुरुस्ती करून केजी ते पीजी पर्यंत आणि परदेशी जाऊन शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थी समूहाला व नोकरीतील बढती साठी तसेच सर्वसाधारण वयो मर्यादा वाढ करून महिलांना ४५वर्षा पर्यंत मुभा देणारा सुधारीत अध्यादेश -शासन निर्णय काढावा त्याअनुषंगाने सुद्धा हा निर्णय म्हणजे जेष्ठ अभ्यासक डॉ राजेंद्र दाते पाटील यांच्या अन्न त्याग उपोषण आंदोलनाचे यश आहे. अन्नत्याग उपोषण आंदोलनाचे पडद्या मागील नियोजनकार जेष्ठ अभ्यासक डॉ राजेंद्र दाते पाटील यांचे उपोषणाची मांडणी म्हणजे " थीम " तयार करण्याची तयारी ऑगस्ट २०२६ पासूनच योजना बद्ध पद्धतीने सुरु होती त्यात प्रमुख्याने उपोषण दरम्यान मागण्या काय असाव्यात? त्याचे कायदेशीर व सामाजीक महत्व काय असेल? असे आंदोलन किंवा उपोषण कोणी जाहीर तर केले गेले नाही ना ? गोंगाट गर्दी न करता उपोषण व त्याचे स्वरूप याची आखनी विनोद काकडे -डॉ शिवानंद भानुसे, लक्ष्मण बापु सिरसाट,सुभाष जावळे, गणेश उगले आदींनी अगदी " परफेक्ट " पद्धतीने प्रत्येक बारकावे विचारात घेउन कायदेशीर व घटनात्मक तरतुदी असलेल्याच मागण्या करायच्या ज्या निश्चित पणे मंजूरच झाल्या पाहिजे हे सूत्र हाती घेउन हे यशस्वी झालेले अन्नत्याग उपोषण आंदोलन ठरले आहे. टीम मुंबईचा पाठपुरावा आमचे पी पी टी कधी पाहणारजेष्ठ अभ्यासक डॉ राजेंद्र दाते पाटील यांनी अत्यन्त अभ्यासपूर्ण असे सुधारीत पॉवर पॉईंट प्रेझेंटेशन तयार केलेले असुन त्यात १२३ पेक्षा जास्त न्याय निवाडे अडथळा ठरत आहेत त्यावर उपाय योजना म्हणुन ५५ फायदेशीर ठरू शकतील असे न्यायनिवाडे यांचे पृष्ठ निहाय,पॅरा निहाय संकलन पुढील हितासाठी मुख्यमंत्री उपमुख्यमंत्री यांनी पहावे म्हणुन सातत्याने पाठपुरावा टीम मुंबई करीत असुन येत्या १५ दिवसात राज्य शासनाने निर्णय घेतला नाही जेष्ठ अभ्यासक डॉ राजेंद्र दाते पाटील यांच्या कार्यास पाठिंबा म्हणुन टीम मुंबई उपोषणात्मक पवित्रा घेणार असुन टिम मुंबईचे रामचंद्र शेडगे,विश्वासू सहकारी अनिल सुर्वे, बाळासाहेब इंगळे, सदाशिव बानुगडे , संतोष शेजवळ, संतोष दळवी, मारुती देसाई, राकेश वासुदेव, पांडुरंग रोडे,सुभाष देसाई, दिनेश पवार, शैलेश शिंदे सुशील निकम, विवेक शिंदे, अंतोष कांबळे,रवींद्र शिंदे, सूर्याजी सोनावले किरण सोनवले,दीपक गायकवाड आदींचा समावेश असणार आहे. शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासूनच मिळणार लाभ यासंदर्भाने कृषी विभागाने २० नोव्हेंबर२०२६ रोजी शासन परिपत्रक निर्गमित केले असुन राज्य सरकारने घेतलेल्या या निर्णया मुळे मराठा समाजातील विद्यार्थ्यांना दिलासा मिळणार आहे.सामान्य प्रशासन विभागाने ५ जून २०२६ रोजी निर्गमित केलेल्या शासन निर्णयानुसार मराठा समाजातील विद्यार्थ्यांना इतर मागासवर्गीय विद्यार्थ्यां प्रमाणे शैक्षणिक सवलती व सोयी- सुविधांचा लाभ शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून अनुज्ञेय असल्या बाबतचे आदेश निर्गमित झाले आहे. त्याच प्रमाणे जेष्ठ अभ्यासक डॉ राजेंद्र दाते पाटील यांची अन्न त्याग उपोषणात मागणी होती कि,ओबीसी तथा मागासवर्गीय प्रवर्गातील विद्यार्थ्यांना लागू असलेल्या शिक्षण शुल्कापेक्षा अधिक शुल्क मराठा विद्यार्थ्यां कडून आकारण्यात येऊ नये. तसेच,शुल्क न भरल्यामुळे त्यांच्या प्रवेश प्रक्रियेत कोणताही अडथळा निर्माण होणार नाही,याचीदक्षता घेण्याच्या सूचना राज्यशासना ने सर्वच आणि या विषयाशी संबधित समस्त विभागांना देण्याचे अत्यंत गरजेचे होते.या निर्णयाची अंमल बजावणी न करणाऱ्या शिक्षणसंस्था व महाविद्यालयां विरुद्ध नियमानुसारकार्यवाही करण्याचेही निर्देश राज्य शासनाने निर्गमित केले आहेत आणि त्या अनुषंगाने महाराष्ट्र राज्यातील चारही कृषी विद्यापीठांच्या अंतर्गत येणाऱ्या कृषी व कृषी संलग्न महाविद्यालयां मधील इतर मागास वर्गीय प्रवर्गातील विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या शैक्षणिक शुल्क,परीक्षा शुल्क व अन्य शुल्क सवलतीमराठा समाजातील पात्र विद्यार्थ्यांनाही लागू करण्यास शासनाने मंजुरी दिलीआहे. या सवलतीं मध्ये प्रवेश शुल्क, विद्यापीठ विद्यार्थी सहाय्य निधी-कल्याण निधी,कॉलेज मॅगेझीन फी,विद्यापीठ विद्यार्थी विमा निधी, ग्रंथालय शुल्क, विद्यापीठ अश्वमेध निधी,जिमखाना शुल्क,नोंदणी शुल्क, विद्यापीठ वैद्यकीय मदत निधी व विद्यार्थी ओळखपत्र शुल्क यांचा समावेश आहे.महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद,पुणे यांच्या प्रवेश पुस्तिकेत नमूद असलेल्या या दहा प्रकारच्या शुल्कांचा लाभ पात्र मराठा विद्यार्थ्यांना सुद्धा मिळणार आहे.या महत्वाच्या निर्णया मुळे जेष्ठ अभ्यासक डॉ राजेंद्र दाते पाटील यांचे प्रदीर्घ असे अन्नत्याग उपोषण आंदोलन यशस्वी ठरले असुन अंत्यन्त संयमाने केलेले हे उपोषण प्रथम पासूनच लक्ष वेधून घेतअसल्या मुळे कायदेशीर व घटनात्मक तरतुदी च्या मागण्या शासन मंजुर करते हे जेष्ठ अभ्यासक यांच्या दृढ अन्न त्याग आंदोलनाने सिद्ध झाल्याची सर्व दुर चर्चा मात्र निश्चित आहे.

कन्नड तालुक्यातील एक जि. प. शाळा वाङ्मयीन उपक्रमासाठी दत्तक घेणार

कन्नड : कन्नड तालुक्यातील व छत्रपती संभाजीनगर परिसरातील जिल्हा परिषद शाळा वाङ्मयीन व सांस्कृतिक उपक्रमासाठी दत्तक घेण्यात येणार आहे. त्रैमासिक तिफण व तिफण वाचक चळवळ यांच्यावतीने ही शाळा दत्तक घेण्यात येणार असून तिफणचे संपादक प्रा. डॉ. शिवाजी हुसे यांनी ही घोषणा केली.या अंतर्गत वाचन कट्टा, लेखन वाचन कौशल्ये कार्यशाळा, साहित्य लेखन शिबीर, साहित्य लेखन स्पर्धा, लेखक आपल्या भेटीला, क्षेत्र भेट, उत्कृष्ट वाचक पुरस्कार, मला आवडलेले पुस्तक, लेखकांना अभिप्रायासाठी पत्र लेखन, बाल साहित्य संमेलन, पुस्तक भेट योजना, हस्तलिखित भित्तीपत्रक, पुस्तक प्रकाशन योजना, चित्रकला स्पर्धा, सुंदर हस्ताक्षर कार्यशाळा, मान्यवरांच्या मुलाखती, बाल आनंद मेळावा, चला नाती जपूया, आई महोत्सव असे विविध वाङ्मयीन व सांस्कृतिक उपक्रम राबविण्यात येणार आहेत.दर महिन्याच्या पहिल्या शनिवारी तिफण परिवार शाळेत जाऊन मुलांसोबत वाचन कट्टा घेणार असून मुलांना वाचायला, लिहायला, बोलायला शिकवण्यासाठी लेखन वाचन कौशल्ये कार्यशाळा घेतली जाणार आहे. वर्षातून एकदा शाळेत साहित्य लेखन शिबीर घेतले जाणार असून दर तीन महिन्याला साहित्य लेखन स्पर्धा घेतली जाणार आहे. मुलांनी लिहिलेले निवडक लेखन तिफण त्रैमासिकात प्रसिद्ध केले जाणार आहे. दर तीन महिन्याला एक लेखक, कवी शाळेला भेट देऊन मुलांसोबत गप्पा मारणार असून वर्षातून एकदा मुलांसाठी क्षेत्र भेट आयोजित केली जाणार आहे. वर्षभरात सर्वात जास्त पुस्तके वाचणाऱ्या विद्यार्थ्याला उत्कृष्ट वाचक पुरस्कार देऊन सन्मानित केले जाणार असून यामध्ये सन्मानपत्र, शाल व श्रीफळ देऊन सन्मान केला जाईल. तसेच मला आवडलेले पुस्तक या उपक्रमात विद्यार्थी आपल्याला आवडलेल्या पुस्तकाबद्दल लिहिणार असून पुस्तकाबद्दल लेखकांना अभिप्रायासाठी पत्र लेखन या उपक्रमात विद्यार्थी आपण वाचलेल्या पुस्तकाच्या लेखकाला आपला अभिप्राय पत्राद्वारे कळवणार आहेत. बाल साहित्य संमेलन आयोजित केले जाणार असून यामध्ये विद्यार्थ्यांना आपले साहित्य सादर करण्याची संधी मिळणार आहे. पुस्तक भेट योजना अंतर्गत वाढदिवस व विविध निमित्ताने विद्यार्थ्यांना पुस्तक भेट दिले जाणार असून हस्तलिखित भित्तीपत्रकातून विद्यार्थ्यांचे लेखन शाळेत लावले जाणार आहे. विद्यार्थ्यांच्या निवडक लेखनाचे पुस्तक प्रकाशन योजना अंतर्गत पुस्तक प्रकाशित केले जाणार आहे. तसेच चित्रकला स्पर्धा, सुंदर हस्ताक्षर कार्यशाळा घेण्यात येणार असून विद्यार्थी मान्यवरांच्या मुलाखती घेणार आहेत. वर्षातून एकदा बाल आनंद मेळावा आयोजित केला जाणार असून चला नाती जपूया व आई महोत्सव असे उपक्रमही राबविण्यात येणार आहेत.यावेळी बोलताना प्रा. डॉ. शिवाजी हुसे म्हणाले, शाळा दत्तक घेणे म्हणजे इमारत बांधणे नाही, तर पिढी घडवणे आहे. मुलांना मोबाईलपासून दूर करून पुस्तकाकडे आणणे, त्यांना वाचायला, लिहायला, बोलायला शिकवणे हाच या उपक्रमाचा उद्देश असून कन्नड तालुक्यातील ही शाळा आदर्श वाङ्मयीन व सांस्कृतिक शाळा बनवायची आहे.शाळा व गावचे नाव लवकरच जाहीर करू, अशी माहिती तिफणचे संपादक तथा या उपक्रमाचे समन्वयक डॉ. शिवाजी हुसे व डॉ. रामचंद्र झाडे यांनी दिली.

मुरूमच्या मुदकण्णा दाम्पत्याचा कार अपघातात दुर्दैवी मृत्यू; परिसरात शोककळा



मुरूम (प्रा. सुधीर पंच्चगल्ले) : संगारेड्डी जिल्ह्यातील (तेलंगणा) जहिराबाद बायपास रोडवर हैदराबाद-सोलापूर राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६५ वर झालेल्या भीषण कार अपघातात मुरूम येथील ज्ञानदान शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष शरणाप्पा सिद्रामप्पा मुदकण्णा (ऊर्फ शरणु अण्णा) व त्यांच्या पत्नी सौ. सुषमा मुदकण्णा यांचे मंगळवारी (ता. २४) रोजी दु:खद निधन झाले. या दुर्दैवी घटनेचे वृत्त समजताच मुरूम शहर व परिसरावर शोककळा पसरली आहे.या अपघातात पती-पत्नी दोघांचाही मृत्यू झाल्याने शैक्षणिक, सामाजिक आणि सहकार क्षेत्रात तीव्र हळहळ व्यक्त केली जात आहे. अत्यंत मनमिळावू स्वभाव आणि कार्यतत्परतेमुळे ते परिसरात 'शरणु अण्णा' या नावाने सर्वपरिचित होते. ते स्वतः सिविल इंजिनियर होते.शरणाप्पा मुदकण्णा यांनी अतिशय कमी कालावधीत मुरूम शहरातील शैक्षणिक क्षेत्रात आपली वेगळी ओळख निर्माण केली होती. ज्ञानदान शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष म्हणून त्यांनी संस्थेला नावारूपाला आणले. शांतीनिकेतन विद्यालयाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना दर्जेदार व गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळावे, तसेच शाळेत उत्तम शिस्त आणि नियोजन राहावे यासाठी ते सातत्याने प्रयत्नशील होते.सहकार क्षेत्रातही त्यांचा मोठा ठसा होता. श्री महात्मा बसवेश्वर सहकारी पतसंस्था मर्यादित, मुरूमचे संस्थेच्या स्थापनेपासूनच व्हाईस चेअरमन म्हणून त्यांनी गेल्या १८ वर्षांपासून उल्लेखनीय कार्य केले. संस्थेला सातत्याने लेखापरीक्षण (ऑडिट) 'अ' वर्ग दर्जा मिळवून देण्यात आणि सहा वेळा विभागीय पुरस्कार प्राप्त करून देण्यात त्यांचा सिंहाचा वाटा होता. समाजात वाचन संस्कृती रुजावी या उद्देशाने त्यांनी पतसंस्थेच्या माध्यमातून 'महात्मा बसवेश्वर सार्वजनिक वाचनालय' सुरू केले होते. याशिवाय संस्थेमार्फत दरवर्षी विविध सामाजिक व शैक्षणिक उपक्रम राबवण्यात त्यांचा पुढाकार असे.मुदकण्णा दाम्पत्याच्या अकाली जाण्याने त्यांच्या कुटुंबावर दु:खाचा डोंगर कोसळला आहे. मृत्यू समयी त्यांचे वय ६१ वर्षे होते. त्यांच्यावर मुरूम येथील कंटेकुर रोड लगत असलेल्या त्यांच्या शेतात बुधवारी (ता. २५) रोजी सकाळी १० वाजता अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. त्यांच्या पश्चात आई, एक भाऊ, दोन बहिणी, मुलगी कु. तेजस्विनी (आयटी अभियंता, वोक्सवॅगन कंपनी) आणि मुलगा चि. वीरकुमार (एमबीबीएस शिक्षण, नेपाळ) असा उच्चशिक्षित परिवार आहे. तसेच शिवसेना (शिंदे गट) नेते चंद्रशेखर मुदकण्णा यांचे ते लहान बंधू होत.

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार २५ नोव्हेंबर २०२६

कंटेकूरच्या प्रथम डॉक्टरांचा व भावी वैद्यकीय विद्यार्थ्याचा 'रोटरी क्लब मुरूम सिटी' तर्फे गौरव



मुरूम (प्रा. सुधीर पंचगल्ले) : उमरगा तालुक्यातील कंटेकूर येथील दोन तरुणांनी वैद्यकीय क्षेत्रात उच्च शिक्षण पूर्ण करून गावाचे पहिले डॉक्टर होण्याचा बहुमान मिळवला आहे. या ऐतिहासिक यशाबद्दल तसेच एका विद्यार्थ्याला शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात प्रवेश मिळाल्याबद्दल रोटरी क्लब मुरूम सिटीच्या वतीने कंटेकूर येथे विशेष सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.कंटेकूर येथील डॉ. गीतांजली चंद्रकांत गावडे यांनी मुंबई येथील नामांकित के.ई.एम. रुग्णालयातून बालरोगतज्ज्ञ ही पदव्युत्तर पदवी संपादन केली. तर, डॉ. सुजित हनुमंत कुंभार यांनी एम.बी.बी.एस. पदवी यशस्वीरित्या पूर्ण केली. हे दोघेही कंटेकूर गावातील पहिले डॉक्टर ठरल्याने गावकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. या निमित्ताने रोटरी अध्यक्ष कल्लय्या स्वामी, सचिव प्रकाश रोडगे, सरपंच विजयाबाई जमादार, माजी अध्यक्ष गोविंद पाटील, प्राचार्य उल्हास घुरघुरे, उपमुख्याध्यापक संतोष कांबळे, महालक्ष्मी ट्रस्टचे अध्यक्ष माधवराव पाटील, विश्वनाथ बिराजदार, चंद्रकांत कुलकर्णी, राम मुडगे, मल्लिकार्जुन बदोले, माजी विस्तार अधिकारी चंद्रकांत गावडे आदींच्या हस्ते डॉ. गीतांजली गावडे यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन यथोचित सत्कार करत हार्दिक अभिनंदन करण्यात आले. डॉ. सुजित कुंभार हे पदव्युत्तर प्रवेश मिळाल्याबद्दल रोटरीच्या वतीने त्यांचेही विशेष अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या.तसेच, गावातील गुणवंत विद्यार्थी सुरज व्यंकट जमादार याची छत्रपती संभाजीनगर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात एम.बी.बी.एस. अभ्यासक्रमासाठी निवड झाली आहे. या यशाबद्दल सुरज जमादार याचा त्याच्या माता-पित्यासह रोटरी क्लब मुरूम सिटीच्या वतीने सत्कार करून भावी वैद्यकीय शिक्षणासाठी मनःपूर्वक शुभेच्छा देण्यात आल्या.ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी जिद्द व चिकाटीच्या जोरावर वैद्यकीय क्षेत्रात मिळवलेले हे यश इतर विद्यार्थ्यांसाठी निश्चितच प्रेरणादायी ठरेल, असे गौरवोद्गार यावेळी रोटरीचे कल्लय्या स्वामी, गोविंद पाटील यांनी काढले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक उल्हास घुरघुरे यांनी केले. सूत्रसंचालन संतोष कांबळे तर आभार प्रकाश रोडगे यांनी मानले. या कार्यक्रमास रोटरीचे पदाधिकारी, सदस्य तसेच कंटेकूर येथील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

'दुष्काळाच्या झळा' : फाटलेला संसार, आटलेल्या डोळ्यांची कविता

कवी नागेश बोंतेवाड यांची 'दुष्काळाच्या झळा' ही कविता एकुण सात प्रसंगातून साकार होतेय. ते सात प्रसंग (दृष्य) असे आहेत.[दृष्य :एक: डोळ्यातला दुष्काळ] सुरुवात आकाशाकडे बघण्याने होत नाही, तर स्वतःच्या डोळ्यात बघण्याने होते. कवी इथे फार मोठं सत्य सांगतोय. पाऊस नाही म्हणून रडून रडून डोळ्यातलं पाणीच आटलंय. आता रडायलाही पाणी शिल्लक नाही. एवढेच नव्हे तर -'ढगाकडे डोळे लावून बळीच्या,डोळ्यातले पाणी आटले.दुष्काळातल्या परिस्थितीने',बळीराजाचे संसार फाटले'.'संसार फाटणे' हा शब्द अंगावर येतो. कपडा फाटतो तसा 'संसार फाटला' आहे.[दृष्य :दोन: गोठ्यातला आक्रोश] दुष्काळ फक्त माणसाचा नसतो, तो मुक्या जनावरांचाही असतो. शेतकरी उपाशी राहील पण गुरांना काय खाऊ घालणार? ही कविता शेतातून गोठ्यात येते आणि तिथले हाल दाखवते- 'चारापाण्याविना गोठ्यात,गुराढोरांचे झाले खूप हाल.असा दुष्काळ पडल्यामुळे,शेतात पिकले नाही माल'.माल नाही म्हणून गोठा रिकामा, आणि गोठा रिकामा म्हणून शेतकऱ्याचं मन रिकामं. हे चक्र कवीने पकडलंय.[दृष्य : तीन: शिवार ओस, घरात रड] इथे कॅमेरा शेतातून थेट घरात येतो. बाहेर शिवार ओस पडलाय आणि आत कुटुंब रडतंय. देवाला हाक मारली आहे, पण ती हाक शेतशिवारातून परत येते आहे- 'दुष्काळाने शेतशिवार देवा,पावसाविना ओस पडले.गुराढोरांचे हाल पाहताच,बळीराजाचे कुटुंब रडले'.शेतकरी एकटा रडत नाही, तर अख्खं कुटुंब रडतं. दुष्काळ हा एकट्या माणसाचा नसतो, तो पिढ्यांचा असतो.[दृष्य :चार: संयम सुटतो तेव्हा] आतापर्यंत सहन करणारा बळीराजा आता वैतागला आहे. तीळतीळ तुटणं हे सहनशक्तीच्या पलीकडचं दु:ख आहे. आणि मेघराजाचं वर्तन म्हणजे येऊन न येणं, हा तर विश्वासघात वाटतोय- 'दुष्काळाच्या झळा पाहून,मन बळीचे तीळतीळ तुटते.मेघराजा तुझे वर्तन पाहून,बळीराजाचे संयम सुटते'.इथे मेघराजा हा 'खलनायक' होतो. त्याच्या वर्तनावर प्रश्न उपस्थित होतो.[दृष्य :पाच: जगाचा पोशिंदा प्रश्न विचारतो] हा कवितेचा सगळ्यात भारी क्षण आहे. जगाचं पोट भरणारा माणूसच विचारतोय . मी जगाचं पोट कसं भरू? स्वतःच्या अस्तित्वावरच प्रश्न विचारताना -'दुष्काळाच्या वेदना आता,आम्ही सहन कसे करावे.मेघराजा आता तूच सांग,या जगाचे पोट कसे भरावे.'हा प्रश्न मेघराजाला नाही, आपल्याला सगळ्यांना आहे.[दृष्य :सहा: दुष्काळाचा दुसरा चेहरा] कवी फक्त भावनिक होत नाही, तो सामाजिक वास्तवावर बोट ठेवतो. पोट रिकामं असेल तर गुन्हेगारी वाढते. हे सत्य कोणीच बोलत नाही, पण कवी बोलतो- 'दुष्काळातल्या झळेने इथे,चोरीमारीचे प्रकार वाढतात.उपाशीपोटी राहून शेतकरी,उन्हातानात दिवस काढतात'.उन्हातान्हात दिवस काढणे, म्हणजे जगणं नाही, तर दिवस ढकलणे. हे जगणं किती असह्य आहे ते या ओळीत आहे.[दृष्य : सात : शेवटची हाक : रया बदलण्याची] शेवट प्रार्थनेने होतो, पण ती भीक नाही. ती रया बदलण्याची मागणी आहे. गावाची रया म्हणजे गावाची इज्जत, शान. पाऊस पडला की फक्त पीक नाही, तर गावाची गेलेली शान परत येते-'आता तरी मेघराजा तुला,येऊ दे रे बळीराजाची दया.आता तरी पाऊस पाडून,बदलून टाक गावाची रया.'दया स्वतःसाठी नाही, बळीराजाची दया मेघराजाला येऊ दे, ही उलटी मागणी आहे. यातच या कवितेचा हटकेपणा आहे. ही कविता पावसाची नाही, तर पावसाअभावी फाटलेल्या संसाराची,आटलेल्या डोळ्यांची आहे. तसेच रिकाम्या गोठ्याची आणि तीळतीळ तुटणाऱ्या मनाची गोष्ट म्हणजे ही कविता आहे.

प्राचार्य डॉ. वसंत बिरादार
महात्मा फुले महाविद्यालय
अहमदपूर, जि. लातूर

अंदमान-निकोबार येथे बहुविषयक राष्ट्रीय परिषदेचे यशस्वी आयोजन; विविध क्षेत्रांतील मान्यवरांचा सन्मान



छत्रपती संभाजीनगर : विज्ञान, तंत्रज्ञान, सामाजिक शास्त्रे आणि मानवविद्या या क्षेत्रांतील नाविन्यपूर्ण संकल्पना, संशोधन आणि विचारांची देवाणघेवाण घडवून आणण्याच्या उद्देशाने अंदमान-निकोबार येथे "इनोव्हेटिव्ह आयडिया इन दि फील्ड ऑफ सायन्स टेक्नॉलॉजी, सोसियल सायन्स अँड ह्युमॅनिटी" या विषयावर बहुविषयक राष्ट्रीय परिषदेचे यशस्वी आयोजन करण्यात आले. या परिषदेचे आयोजन डॉ. अशोक चव्हाण रिसर्च फाउंडेशन (ए.सी.आर. एफ.), छत्रपती संभाजीनगर आणि सोसायटी ऑफ सायन्स, टेक्नॉलॉजी अँड ह्युमॅनिटी, कल्याण, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले होते. या राष्ट्रीय परिषदेचे उद्घाटन भारतीय वनस्पती सर्वेक्षण (बी. एस. आय.) च्या रिजनल सेंटरचे संचालक डॉ. लालजी सिंह तसेच जे. एन. आर. एम. महाविद्यालयातील वनस्पतीशास्त्र विभागाचे प्रमुख प्रसिद्ध मायकोलॉजिस्ट डॉ. दिपोन शर्मा यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी मान्यवरांनी विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात संशोधन, नाविन्यपूर्ण कल्पना आणि आंतरविद्याशाखीय दृष्टिकोनाचे महत्त्व अधोरेखित केले. या परिषदेमध्ये शैक्षणिक व संशोधन क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल मान्यवरांचा विशेष सन्मान करण्यात आला. यामध्ये प्राचार्य डॉ. दीपक रावेरकर यांना त्यांच्या दीर्घकालीन शैक्षणिक आणि सामाजिक योगदानाबद्दल "लाइफ टाइम अचिएवमेंट्स" अवॉर्ड प्रदान करून गौरविण्यात आले. तसेच डॉ. अशोक चव्हाण रिसर्च फाउंडेशनच्या वतीने डॉ. वसंत माळी यांना शैक्षणिक क्षेत्रातील उत्कृष्ट कार्याबद्दल "एक्सेलेन्स इन अकॅडमिक्स" अवॉर्ड देऊन सन्मानित करण्यात आले. या राष्ट्रीय परिषदेला देशाच्या विविध भागांतून 60 पेक्षा अधिक संशोधक, प्राध्यापक, विद्यार्थी आणि अभ्यासकांनी सहभाग नोंदविला. यापैकी 30 संशोधकांनी विविध विषयांवरील आपले संशोधन पेपर सादर केले. विज्ञान, तंत्रज्ञान, सामाजिक शास्त्रे आणि मानवविद्या अशा विविध विषयांतील संशोधनाला डॉ. अशोक चव्हाण रिसर्च फाउंडेशनने व्यासपीठ उपलब्ध करून देणे हे या परिषदेचे प्रमुख वैशिष्ट्य ठरले. संशोधकांमधील सर्जनशीलता, संशोधनातील गुणवत्ता आणि नाविन्यपूर्ण विचारांना प्रोत्साहन देण्यासाठी डॉ. अशोक चव्हाण रिसर्च फाउंडेशनच्या वतीने परिषदेमध्ये कु. स्मृती मिश्रा आणि डॉ. अलोक गुढे यांना "बेस्ट पेपर प्रेझेन्टेशन अवॉर्ड" आणि डॉ. रफी अहमद यांना "बेस्ट इनोव्हेटिव्ह आयडिया आवर्ड" ने सन्मानित करण्यात आले. या पुरस्कारांच्या माध्यमातून उत्कृष्ट संशोधन सादरीकरण आणि समाजोपयोगी नाविन्यपूर्ण संकल्पनांना प्रोत्साहन देण्यात आले. अंदमान-निकोबारसारख्या निसर्गरम्य बेटांवर आयोजित करण्यात आलेल्या या राष्ट्रीय परिषदेने संशोधक, प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांना राष्ट्रीय स्तरावर विचारांची देवाणघेवाण करण्याची तसेच संशोधनातील नवीन संधी जाणून घेण्याची महत्त्वपूर्ण संधी उपलब्ध करून दिली. विविध ज्ञानशाखांमधील समन्वय, संशोधन संस्कृतीचा विकास आणि नाविन्यपूर्ण विचारांना चालना देण्याच्या दृष्टीने ही परिषद अत्यंत महत्त्वपूर्ण ठरली.

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार २५ नोव्हेंबर २०२६

जात अजून मेली नाही!

जात अजून मेली नाही,
फक्त तिने आपला चेहरा बदललाय...
कपाळावरचा टिळा पुसलाय,
पण मनावरचा शिक्का अजून तसाच ठेवलाय!

ती अजूनही जिवंत आहे,
आपल्या विचारांच्या कोपऱ्यात,
आपल्या वागण्याच्या भाषेत,
आणि माणसाला माणूस मानताना
मनात उठणाऱ्या प्रश्नांत!

माणूस शिकलेला झाला,
मोठ्या पदावर पोहोचला,
सुटाबुटात वावरू लागला,
पण विचारांची जात
अजूनही गावकुसाबाहेरच राहिली!

नावापुढची आडनावे बदलली,
घरांचे पत्ते बदलले,
राहणीमान बदलले,
पण लग्नाची वेळ येताच
जातकुळीचा शोध सुरू झाला!

प्रेम करणाऱ्या दोन जीवांच्या मध्ये
जात कशी उभी राहते?
रक्त एकच असताना
रक्ताची नाती जातीत कशी विभागली जाते ?

माणसाच्या जन्माचा
त्याने कुठे घेतलाय निर्णय?
मग त्याच्या जन्मावरून
त्याची लायकी ठरवणारे आपण कोण?

कायद्याच्या पुस्तकात समानता आहे,
संविधानाच्या पानांवर स्वातंत्र्य आहे,
पण माणसाच्या मनात अजूनही
भेदभावाचे विष जिवंत आहे!

आरक्षणाचा विषय निघाला की
स्वाभिमान जागा होतो,
पण शतकानुशतके हिरावून घेतलेल्या
संधींचा इतिहास मात्र विसरला जातो!

जात माणसाला तोडते,
माणुसकीला पोखरते,
कुणाच्या हाताला विटाळ म्हणते,
तर कुणाच्या जन्माला श्रेष्ठत्व बहाल करते!

कुणाच्या डोक्यावर मुकुट,
कुणाच्या पायात बेड्या,
कुणाच्या वाट्याला सत्ता,
तर कुणाच्या वाट्याला पिढ्यान्‌पिढ्यांच्या वेदना!

किती काळ चालणार हा खेळ?
किती पिढ्या सोसणार हा अपमान?
किती लेकरांच्या स्वप्नांची राख
जातीय अहंकाराच्या चितेवर पडणार?

मला जात नसलेला देश हवा आहे,
जिथे आडनावापेक्षा माणूस मोठा असेल,
जिथे रक्ताचा पाहिला जाईल रंग,
वंशाचा इतिहास नाही!

जिथे मुलीच्या लग्नात
कुळापेक्षा तिचे स्वप्न महत्त्वाचे असेल,
जिथे माणसाची ओळख
त्याच्या कर्तृत्वाने ठरेल, जन्माने नाही!

लक्षात ठेवा...
जात एका दिवसात नाही आली जन्माला,
म्हणून ती एका दिवसात मरणारही नाही;
तिच्या मुळांवर घाव घालावा लागेल,
आपल्याच मनातला जातीय अहंकार
सर्वप्रथम जाळावा लागेल!

ज्या दिवशी माणूस
माणसाच्या जातीचा अभिमान बाळगणार नाही,
ज्या दिवशी भाकरी देणाऱ्या हाताला
धर्म आणि जात विचारली जाणार नाही,
ज्या दिवशी रक्ताच्या नात्यापेक्षा
माणुसकीचं नातं मोठं ठरेल...
त्या दिवशी जात
केवळ इतिहासाच्या पानात उरेल!

तोपर्यंत सांगायचं आहे एकच ...
जात अजून मेली नाही,
कारण माणूस अजून माणूस झालेला नाही!

आता लढाई दुसऱ्याची जात विचारण्याची नाही,
तर स्वतःच्या मनातली जात मारण्याची आहे!

माणूस म्हणून जन्माला आलात,
तर माणूस म्हणून जगायला शिकुया !

- डॉ. बाळासाहेब बा. लिहिणार
छत्रपती संभाजीनगर

दुष्काळात या शासनकर्त्यांनी घेतलं पहा कसं अंग काढूनी

सगळ्या फायनान्सवाल्यांनी मिळूनी
पार्टीसाठी फंड द्या कंटेनर भरुनी
तव्हा पहा जोरात कशी होईल वसुली

दरयळेला बळीचा बकरा होई शेतकरी
या यळेला फायनान्सवाला बनवला यांनी
फायनान्सवाल्यावर दिलं सगळं लोटूनी...

दुष्काळात या शासनकर्त्यांनी
घेतलं पहा कसं अंग काढूनी...

लोकशाही राहिली फक्त नावाची
झाली ती शासनाच्या हुकूमशाहीची
महागाईची दुष्काळाशी तडजोड नाही
हमीभाव, बेरोजगारीचा विषयच नाही

वर्षभराचं ज्यांचं गेलं पीक जळूनी
पाच हजार रुपयांत केली तोडीपाणी
जन इच्छा नसली तरी हे शासन पुन्हा येईल निवडूनी
नोट दावली की वोट येई ईव्हीएममधूनी...

दुष्काळात या शासनकर्त्यांनी
घेतलं पहा कसं अंग काढूनी...

काळं धन कुठं ठेवलं गाडूनी
गुलाबी नोटा टाकल्या गायब करुनी
अभ्यास करी जे इमानदारीनी
केली आशेची नसबंदी पेपरफुटी करुनी

सरकारी शाळा आता बंद करुनी
खाजगी शाळा देणार मढ्यावर टाकूनी
दवाखान्यांचाही केला धंदा यांनी
अच्छे दिन भोगून घ्या सगळ्यांनी...

दुष्काळात या शासनकर्त्यांनी
घेतलं पहा कसं अंग काढूनी...

जंगलं खाणारा गुन्हेगार नाही
त्यांच्या कायद्यात तसा गुन्हा नाही
खापर दुष्काळावर फोडून यांनी
देश विकायला काढला यांनी

वसुलीवाला केला गुंडा यांनी
कायदे स्वहिताचे घेतले करुनी
सबका साथ, अपना विकास केला यांनी
करी हुकूमत कायद्यांची मनमानी...

दुष्काळात या शासनकर्त्यांनी
घेतलं पहा कसं अंग काढूनी...

- लक्ष्मण वाल्डे
छत्रपती संभाजीनगर





महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार २५ नोव्हेंबर २०२६

संविधान : समतेचा विचार आणि लोकशाहीचा जागर - डॉ. राजेंद्र बगाटे

२६ नोव्हेंबर हा दिवस भारतीय लोकशाहीच्या इतिहासातील अत्यंत महत्त्वाचा आणि गौरवशाली दिवस आहे. याच दिवशी १९४९ मध्ये भारतीय संविधान सभेने स्वतंत्र भारताचे संविधान स्वीकारले. त्यामुळे दरवर्षी २६ नोव्हेंबर हा दिवस देशभरात 'संविधान दिन' म्हणून साजरा केला जातो. संविधान म्हणजे केवळ देशाचा कारभार चालविण्यासाठी तयार केलेला कायदेशीर दस्तऐवज नव्हे, तर तो भारतीय लोकशाहीचा आत्मा, नागरिकांच्या अधिकारांचा संरक्षक आणि न्यायपूर्ण समाजव्यवस्थेचा भक्कम आधार आहे. विविध भाषा, धर्म, जाती, पंथ, संस्कृती आणि परंपरा असलेल्या भारतासारख्या विशाल देशाला एकात्मतेच्या सूत्रात बांधण्याचे ऐतिहासिक कार्य संविधानाने केले आहे. स्वातंत्र्य, समता, न्याय आणि बंधुता या मूल्यांच्या आधारावर प्रत्येक नागरिकाला सन्मानाने जगण्याची संधी उपलब्ध करून देणे हा संविधानाचा मूलभूत उद्देश आहे. म्हणूनच संविधान दिन हा केवळ ऐतिहासिक घटनेचे स्मरण करण्याचा दिवस नसून संविधानाने दिलेल्या मूल्यांचे आत्मपरीक्षण करण्याचा आणि त्यानुसार आचरण करण्याचा संकल्प करण्याचा दिवस आहे.भारतीय संविधानाच्या निर्मितीमागे स्वातंत्र्यलढ्याचा दीर्घ इतिहास, सामाजिक परिवर्तनाच्या चळवळी आणि समताधिष्ठित समाजव्यवस्थेची आकांक्षा कार्यरत होती. ब्रिटिश राजवटीच्या काळात भारतीय जनतेला राजकीय स्वातंत्र्याबरोबरच सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक स्वातंत्र्याचीही आवश्यकता जाणवत होती. स्वातंत्र्यलढ्यातील अनेक नेत्यांनी लोकशाही, नागरी हक्क, समानता आणि स्वशासन यांचा आग्रह धरला. महात्मा जोतिराव फुले, राजर्षी शाहू महाराज, महात्मा गांधी, पंडित जवाहरलाल नेहरू, सरदार वल्लभभाई पटेल आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यासह अनेक विचारवंत आणि समाजसुधारकांच्या कार्यातून समताधिष्ठित समाजनिर्मितीची संकल्पना विकसित झाली. भारतीय समाजातील वंचित, शोषित, दुर्बल आणि उपेक्षित घटकांना प्रतिष्ठेचे जीवन मिळावे, ही या परिवर्तनवादी विचारांची मध्यवर्ती भूमिका होती. या सर्व ऐतिहासिक आणि वैचारिक प्रवाहांचे प्रतिबिंब भारतीय संविधानात दिसून येते.भारताच्या संविधान सभेची पहिली बैठक ९ डिसेंबर १९४६ रोजी झाली. देशाला स्वातंत्र्य मिळण्यापूर्वीच स्वतंत्र भारताची राज्यव्यवस्था कशी असावी, नागरिकांचे अधिकार कोणते असावेत आणि शासनव्यवस्थेची रचना कशी असावी, यावर विचारमंथन सुरू झाले होते. संविधान सभेमध्ये विविध प्रांतांतील, सामाजिक समूहांतील आणि वैचारिक प्रवाहांतील प्रतिनिधी सहभागी झाले होते. त्यांनी अनेक विषयांवर सखोल चर्चा करून संविधानाचा मसुदा तयार केला. २९ ऑगस्ट १९४७ रोजी मसुदा समितीची स्थापना करण्यात आली आणि या समितीच्या अध्यक्षपदी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची निवड झाली. त्यांनी विविध देशांच्या संविधानांचा अभ्यास, भारतीय समाजाची वास्तविक परिस्थिती, लोकशाहीची तत्त्वे आणि सामाजिक न्यायाची आवश्यकता लक्षात घेऊन संविधानाच्या मसुद्याला आकार दिला. संविधाननिर्मितीची प्रक्रिया दोन वर्षे, अकरा महिने आणि अठरा दिवस चालली. या काळात संविधान सभेच्या अकरा अधिवेशनांमध्ये सखोल चर्चा झाली. अखेर २६ नोव्हेंबर १९४९ रोजी संविधान सभेने भारतीय संविधान स्वीकारले. त्यानंतर २६ जानेवारी १९५० रोजी ते संपूर्ण देशात लागू झाले आणि भारत सार्वभौम लोकशाही प्रजासत्ताक राष्ट्र बनला.भारतीय संविधानाच्या निर्मितीमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. भारतीय समाजातील जातीय विषमता, अस्पृश्यता, सामाजिक अन्याय आणि आर्थिक शोषण यांचे त्यांनी प्रत्यक्ष अनुभव घेतले होते. त्यामुळे राजकीय स्वातंत्र्याबरोबरच सामाजिक आणि आर्थिक समानतेची हमी देणारी व्यवस्था निर्माण होणे आवश्यक आहे, असा त्यांचा ठाम आग्रह होता. त्यांच्या मते, लोकशाही ही केवळ शासनव्यवस्थेची पद्धत नसून ती सामाजिक जीवन जगण्याची एक पद्धत आहे. स्वातंत्र्य, समता आणि बंधुता ही लोकशाहीची मूलभूत मूल्ये समाजाच्या प्रत्येक स्तरावर रुजली पाहिजेत. संविधानाच्या माध्यमातून प्रत्येक नागरिकाला समान प्रतिष्ठा आणि संधी मिळवून देण्याचा त्यांनी प्रयत्न केला. संविधान सभेतील इतर सदस्य, विविध समित्यांचे अध्यक्ष, तज्ज्ञ आणि प्रतिनिधी यांच्या सामूहिक योगदानातून संविधान आकाराला आले. त्यामुळे भारतीय संविधान हे एका व्यक्तीचे नव्हे, तर सामूहिक विचारमंथनातून साकारलेले राष्ट्रीय दस्तऐवज आहे. तथापि, त्याच्या निर्मितीतील डॉ. आंबेडकरांचे नेतृत्व आणि वैचारिक योगदान भारतीय इतिहासात विशेष महत्त्वाचे आहे.भारतीय संविधानाची उद्देशिका हा संपूर्ण संविधानाचा आत्मा मानला जातो. उद्देशिकेत भारताला सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष, लोकशाही प्रजासत्ताक राष्ट्र म्हणून घोषित करण्यात आले आहे. देशातील सर्व नागरिकांना सामाजिक, आर्थिक आणि राजकीय न्याय; विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा आणि उपासना यांचे स्वातंत्र्य; दर्जाची आणि संधीची समानता मिळवून देण्याचा संकल्प त्यामध्ये व्यक्त करण्यात आला आहे. तसेच व्यक्तीची प्रतिष्ठा आणि राष्ट्राची एकता व एकात्मता सुनिश्चित करणारी बंधुता निर्माण करण्याचे उद्दिष्ट मांडण्यात आले आहे. उद्देशिकेतील प्रत्येक शब्द भारतीय लोकशाहीच्या मूलभूत तत्त्वांचे प्रतिनिधित्व करतो. ती शासनसंस्थांना त्यांच्या कर्तव्यांची जाणीव करून देते आणि नागरिकांना राष्ट्राच्या सामूहिक जबाबदारीची आठवण करून देते. उद्देशिकेतील मूल्ये केवळ पुस्तकी संकल्पना न राहता सामाजिक व्यवहारात उतरली, तरच लोकशाही अधिक अर्थपूर्ण होऊ शकते.भारतीय संविधानाने प्रत्येक नागरिकाला मूलभूत अधिकार प्रदान केले आहेत. हे अधिकार व्यक्तीच्या सर्वांगीण विकासासाठी आणि मानवी प्रतिष्ठेच्या संरक्षणासाठी अत्यंत आवश्यक आहेत. समानतेचा अधिकार, स्वातंत्र्याचा अधिकार, शोषणाविरुद्धचा अधिकार, धर्मस्वातंत्र्याचा अधिकार, सांस्कृतिक आणि शैक्षणिक अधिकार तसेच घटनात्मक उपायांचा अधिकार यांचा त्यामध्ये समावेश होतो. जात, धर्म, लिंग, वंश किंवा जन्मस्थान यांच्या आधारे भेदभाव करण्यास संविधानाने प्रतिबंध केला आहे. कायद्यापुढे सर्व नागरिक समान आहेत आणि प्रत्येकाला कायद्याचे समान संरक्षण मिळण्याची हमी देण्यात आली आहे. अस्पृश्यता नष्ट करण्याची घटनात्मक तरतूद ही भारतीय समाजाच्या परिवर्तनाच्या दृष्टीने ऐतिहासिक ठरली आहे. अभिव्यक्तिस्वातंत्र्य, शांततापूर्ण सभा घेण्याचे स्वातंत्र्य, संघटना स्थापन करण्याचे स्वातंत्र्य आणि देशात मुक्तपणे संचार करण्याचे स्वातंत्र्य यांमुळे नागरिकांच्या व्यक्तिमत्त्व विकासाला व्यापक संधी उपलब्ध झाली आहे. हे अधिकार नागरिकांना शासनाच्या मनमानी कारभारापासून संरक्षण देतात. मात्र, अधिकारांचा उपभोग घेताना कायद्याचे पालन आणि इतरांच्या अधिकारांचा आदर करणेही तितकेच आवश्यक आहे.मूलभूत अधिकारांप्रमाणेच राज्याच्या धोरणाची मार्गदर्शक तत्त्वे भारतीय संविधानाचा महत्त्वाचा भाग आहेत. या तत्त्वांद्वारे शासनाने सामाजिक आणि आर्थिक न्यायावर आधारित कल्याणकारी राज्याची निर्मिती करण्यासाठी प्रयत्न करावेत, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे. नागरिकांना उपजीविकेची साधने, समान कामासाठी समान वेतन, शिक्षणाच्या संधी, सार्वजनिक आरोग्य, बालकांचे संरक्षण आणि दुर्बल घटकांचे कल्याण यांसारख्या बाबींना महत्त्व देण्यात आले आहे. ही तत्त्वे न्यायालयामार्फत थेट अंमलात आणता येत नसली, तरी देशाच्या शासनव्यवस्थेसाठी ती मूलभूत मार्गदर्शक ठरतात. शासनाने आखलेली धोरणे आणि राबविलेल्या विकास योजना या तत्त्वांच्या दिशेने वाटचाल करणाऱ्या असणे अपेक्षित आहे. त्यामुळे संविधान केवळ राजकीय अधिकारांपुरते मर्यादित राहत नाही, तर नागरिकांच्या जीवनमानात सुधारणा घडवून आणण्याची व्यापक जबाबदारीही शासनावर सोपवते.भारतीय संविधानाने संसदीय लोकशाहीची व्यवस्था स्वीकारली आहे. या व्यवस्थेमध्ये लोकप्रतिनिधींची निवड नागरिकांकडून केली जाते आणि निवडून आलेले प्रतिनिधी जनतेच्या वतीने शासनकारभार चालवतात. सार्वत्रिक प्रौढ मताधिकार हे भारतीय लोकशाहीचे अत्यंत महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. जात, धर्म, भाषा, लिंग, संपत्ती किंवा सामाजिक दर्जा यांचा विचार न करता निर्धारित वय पूर्ण केलेल्या प्रत्येक पात्र नागरिकाला मतदानाचा अधिकार देण्यात आला आहे. यामुळे सामान्य नागरिकालाही देशाच्या राजकीय प्रक्रियेत सहभागी होण्याची संधी मिळाली. लोकशाहीमध्ये सत्ता ही जनतेकडून प्राप्त होते आणि ती जनतेच्या कल्याणासाठी वापरणे अपेक्षित असते. निवडणुका, संसद, विधिमंडळे, स्थानिक स्वराज्य संस्था आणि स्वतंत्र निवडणूक आयोग या माध्यमांतून लोकशाही व्यवस्था कार्यरत राहते. मात्र, केवळ मतदान करणे म्हणजे लोकशाहीतील सहभाग पूर्ण होणे नव्हे. शासनाच्या धोरणांवर लक्ष ठेवणे, सार्वजनिक प्रश्नांवर जागरूक भूमिका घेणे आणि लोकप्रतिनिधींना उत्तरदायी धरणे हीदेखील नागरिकांची महत्त्वाची कर्तव्ये आहेत.भारतीय संविधानाने केंद्र आणि राज्य यांच्यामध्ये अधिकारांचे विभाजन करून संघराज्यात्मक शासनव्यवस्थेची निर्मिती केली आहे. देशाची एकता आणि अखंडता कायम राखतानाच राज्यांना त्यांच्या स्थानिक गरजांनुसार कारभार करण्याची संधी देण्यात आली आहे. केंद्रसूची, राज्यसूची आणि समवर्ती सूची यांच्या माध्यमातून विविध विषयांवरील अधिकारांचे विभाजन करण्यात आले आहे. भारताच्या विशाल भौगोलिक क्षेत्रात विविध भाषा, संस्कृती, सामाजिक परंपरा आणि आर्थिक परिस्थिती आढळते. अशा परिस्थितीत संघराज्यात्मक रचना राष्ट्रीय एकात्मता आणि प्रादेशिक स्वायत्तता यांच्यात समतोल राखण्यास मदत करते. संसदीय शासनपद्धती, स्वतंत्र न्यायव्यवस्था आणि घटनात्मक संस्थांच्या माध्यमातून सत्तेवर नियंत्रण ठेवण्याची व्यवस्था निर्माण करण्यात आली आहे. सर्वोच्च न्यायालय आणि उच्च न्यायालये संविधानाचे संरक्षण करतात. कायद्याचे राज्य आणि न्यायालयीन पुनर्विलोकनाची व्यवस्था लोकशाहीला अधिक बळकट करते.भारतीय संविधानाचे आणखी एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे सामाजिक न्यायाची बांधिलकी. भारतीय समाजामध्ये दीर्घकाळापासून अस्तित्वात असलेल्या जातीय विषमता, अस्पृश्यता, स्त्री-पुरुष असमानता आणि सामाजिक शोषणाचे उच्चाटन करण्यासाठी संविधानाने अनेक तरतुदी केल्या आहेत. अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या घटकांच्या प्रगतीसाठी विशेष उपाययोजनांना घटनात्मक आधार देण्यात आला आहे. शिक्षण, नोकरी आणि राजकीय प्रतिनिधित्वाच्या क्षेत्रात आरक्षणासारख्या तरतुदींमुळे ऐतिहासिकदृष्ट्या वंचित राहिलेल्या समूहांना संधी उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न झाला आहे. महिलांना समानतेचा अधिकार, मतदानाचा अधिकार आणि सार्वजनिक जीवनात सहभागी होण्याची संधी मिळाली आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांसाठी आरक्षणाच्या तरतुदींमुळे राजकीय नेतृत्वात त्यांचा सहभाग वाढण्यास मदत झाली आहे. तथापि, कायद्याने समानतेची हमी दिली असली, तरी प्रत्यक्ष व्यवहारात सामाजिक भेदभाव आणि विषमता अद्यापही दिसून येते. त्यामुळे संविधानातील सामाजिक न्यायाचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी शासनाबरोबरच समाजातील प्रत्येक घटकाने प्रयत्न करणे आवश्यक आहे.भारतीय संविधानाने धर्मनिरपेक्षतेच्या तत्त्वाला महत्त्व दिले आहे. भारत हा विविध धर्मांच्या आणि श्रद्धांच्या लोकांचा देश आहे. प्रत्येक नागरिकाला आपल्या धर्माचे पालन, आचरण आणि प्रसार करण्याचे स्वातंत्र्य आहे. त्याचबरोबर कोणत्याही धर्माच्या आधारे नागरिकांमध्ये भेदभाव केला जाऊ नये, ही घटनात्मक अपेक्षा आहे. राज्याने सर्व धर्मांबाबत समान आदर आणि न्यायाची भूमिका ठेवणे आवश्यक आहे. धार्मिक विविधतेचा स्वीकार, परस्परांच्या श्रद्धांचा आदर आणि सामाजिक सलोखा ही भारतीय लोकशाहीची महत्त्वाची वैशिष्ट्ये आहेत. धर्माच्या नावावर द्वेष, हिंसा किंवा सामाजिक तेढ निर्माण करणे हे संविधानाच्या मूलभूत भावनेला विरोध करणारे आहे. विविधतेमध्ये एकता ही केवळ घोषवाक्य न राहता ती प्रत्येकाच्या दैनंदिन वर्तनातून व्यक्त झाली पाहिजे. धार्मिक सहिष्णुता, परस्पर संवाद आणि बंधुभाव यांच्या माध्यमातूनच राष्ट्रीय एकात्मता अधिक दृढ होऊ शकते.संविधानाने नागरिकांच्या मूलभूत अधिकारांबरोबरच मूलभूत कर्तव्यांचाही उल्लेख केला आहे. १९७६ मधील बेचाळीसाव्या घटनादुरुस्तीने संविधानात मूलभूत कर्तव्यांचा समावेश करण्यात आला. संविधानाचा आदर करणे, राष्ट्रध्वज आणि राष्ट्रगीताचा सन्मान राखणे, स्वातंत्र्यलढ्याला प्रेरणा देणाऱ्या उदात्त आदर्शांचे पालन करणे, देशाची एकता आणि अखंडता जपणे, सार्वजनिक संपत्तीचे संरक्षण करणे, वैज्ञानिक दृष्टिकोन आणि मानवतावाद विकसित करणे, पर्यावरणाचे रक्षण करणे आणि स्त्रियांच्या प्रतिष्ठेला बाधा आणणाऱ्या प्रथांचा त्याग करणे ही नागरिकांची महत्त्वाची कर्तव्ये आहेत. अधिकार आणि कर्तव्ये ही लोकशाही व्यवस्थेची परस्परपूरक अंगे आहेत. नागरिकांनी केवळ आपल्या अधिकारांची मागणी न करता सामाजिक जबाबदारीची जाणीव ठेवली पाहिजे. वाहतुकीचे नियम पाळणे, सार्वजनिक ठिकाणी स्वच्छता राखणे, कर भरणे, पर्यावरणाचे संवर्धन करणे आणि सामाजिक सलोखा जपणे हीदेखील जबाबदार नागरिकत्वाची व्यावहारिक उदाहरणे आहेत.आजच्या काळात भारतीय संविधानासमोर अनेक नवीन सामाजिक, आर्थिक आणि तांत्रिक आव्हाने उभी राहत आहेत. जागतिकीकरण, खासगीकरण, डिजिटल तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता, सामाजिक माध्यमांचा वाढता प्रभाव आणि बदलती अर्थव्यवस्था यांमुळे समाजजीवनाचे स्वरूप वेगाने बदलत आहे. या बदलांच्या पार्श्वभूमीवर नागरिकांचे गोपनीयतेचे स्वातंत्र्य, माहितीचा अधिकार, अभिव्यक्तिस्वातंत्र्य, डिजिटल समानता आणि माहितीची सुरक्षितता यांसारखे प्रश्न महत्त्वाचे ठरत आहेत. तंत्रज्ञानाच्या संधी सर्व नागरिकांना समान प्रमाणात उपलब्ध होत नसल्यामुळे डिजिटल दरी निर्माण होत आहे. ग्रामीण, आदिवासी, दुर्गम आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल भागांतील नागरिकांना डिजिटल सुविधा आणि गुणवत्तापूर्ण शिक्षण उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. तंत्रज्ञानाचा वापर करताना मानवी प्रतिष्ठा, वैयक्तिक स्वातंत्र्य आणि समान संधी या घटनात्मक मूल्यांचे संरक्षण झाले पाहिजे. आधुनिक विकासाच्या प्रक्रियेत संविधानातील मूलभूत तत्त्वे मार्गदर्शक ठरली पाहिजेत.लोकशाहीसमोरील आणखी एक गंभीर आव्हान म्हणजे सामाजिक आणि आर्थिक विषमता. एका बाजूला विकासाच्या नव्या संधी निर्माण होत असताना दुसऱ्या बाजूला बेरोजगारी, गरिबी, शेतकऱ्यांच्या समस्या, कुपोषण, शिक्षणातील असमानता आणि आरोग्यसेवांची अनुपलब्धता यांसारखे प्रश्न कायम आहेत. महिलांवरील अत्याचार, बालमजुरी, मानवी तस्करी, जातीय भेदभाव आणि सामाजिक बहिष्कार या समस्या संविधानाने अपेक्षित केलेल्या न्यायपूर्ण समाजनिर्मितीच्या मार्गातील अडथळे आहेत. कायदे आणि योजना अस्तित्वात असणे पुरेसे नाही, तर त्यांची प्रभावी अंमलबजावणी होणे महत्त्वाचे आहे. प्रत्येक नागरिकाला गुणवत्तापूर्ण शिक्षण, आरोग्यसेवा, रोजगाराच्या संधी आणि सन्मानाने जगण्याचा अधिकार प्रत्यक्षात मिळाला पाहिजे. विकासाचे मूल्यमापन केवळ आर्थिक वाढीच्या आकडेवारीवर न करता समाजातील शेवटच्या घटकापर्यंत विकासाचे लाभ पोहोचले आहेत की नाही, यावर केले पाहिजे. हीच संविधानाच्या कल्याणकारी आणि समताधिष्ठित दृष्टिकोनाची खरी कसोटी आहे.संविधानाच्या प्रभावी अंमलबजावणीमध्ये शिक्षणाची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. संविधानातील मूल्यांची माहिती प्रत्येक नागरिकाला असणे आवश्यक आहे. शाळा, महाविद्यालये आणि विद्यापीठांमध्ये संविधानविषयक शिक्षणाला केवळ औपचारिक कार्यक्रमापुरते मर्यादित न ठेवता ते अभ्यासक्रम, चर्चा, उपक्रम आणि प्रत्यक्ष सामाजिक सहभागाशी जोडले पाहिजे. विद्यार्थ्यांना मूलभूत अधिकार, कर्तव्ये, लोकशाही प्रक्रिया, सामाजिक न्याय, धर्मनिरपेक्षता आणि मानवी हक्क यांची जाणीव करून दिली पाहिजे. संविधान साक्षरता वाढल्यास नागरिकांमध्ये चिकित्सक विचार, वैज्ञानिक दृष्टिकोन आणि सामाजिक जबाबदारीची भावना विकसित होऊ शकते. विशेषतः युवकांनी संविधानाचा अभ्यास करून लोकशाही प्रक्रियेत सक्रिय सहभाग घेतला पाहिजे. सामाजिक माध्यमांवर प्रसारित होणाऱ्या चुकीच्या माहितीपासून सावध राहणे, विवेकपूर्ण चर्चा करणे आणि मतभिन्नतेचा आदर करणे ही आजच्या नागरिकत्वाची महत्त्वाची वैशिष्ट्ये आहेत. संविधानाचे ज्ञान हे केवळ परीक्षेसाठी नसून जीवन जगण्याची योग्य दिशा देणारे ज्ञान आहे.२६ नोव्हेंबर २०१५ पासून भारत सरकारने हा दिवस अधिकृतपणे संविधान दिन म्हणून साजरा करण्यास सुरुवात केली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंती वर्षाच्या निमित्ताने संविधानाच्या महत्त्वाबद्दल जनजागृती करण्याच्या उद्देशाने हा निर्णय घेण्यात आला. या दिवसानिमित्त देशभरात संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन, व्याख्याने, चर्चासत्रे, निबंध स्पर्धा, प्रश्नमंजुषा आणि विविध शैक्षणिक उपक्रम आयोजित केले जातात. या कार्यक्रमांचा मुख्य हेतू संविधानाविषयी नागरिकांमध्ये आदरभाव निर्माण करणे आणि घटनात्मक मूल्यांची जाणीव वाढविणे हा आहे. मात्र, संविधान दिनाचे महत्त्व केवळ एका दिवसापुरते मर्यादित ठेवणे योग्य ठरणार नाही. वर्षभर आपल्या वर्तनातून संविधानातील मूल्यांचे पालन करणे हीच या दिवसाची खरी फलश्रुती ठरेल.भारतीय संविधान हे स्थिर दस्तऐवज नसून बदलत्या काळानुसार विकसित होणारी लोकशाही व्यवस्था आहे. संविधानात आवश्यकतेनुसार दुरुस्ती करण्याची तरतूद आहे. समाजाच्या बदलत्या गरजा, नवीन आव्हाने आणि लोकशाहीच्या अनुभवांच्या आधारे घटनात्मक व्यवस्था अधिक सक्षम करण्याची संधी या प्रक्रियेतून मिळते. तथापि, कोणतीही घटनादुरुस्ती करताना संविधानाची मूलभूत रचना आणि त्यातील लोकशाही मूल्यांचे संरक्षण होणे आवश्यक आहे. संविधानाचा सन्मान म्हणजे त्यातील तरतुदींचे अंधानुकरण नव्हे, तर त्यामागील न्याय, समता, स्वातंत्र्य आणि बंधुता या तत्त्वांचा विवेकपूर्ण स्वीकार होय. शासनसंस्था, न्यायव्यवस्था, प्रशासन, प्रसारमाध्यमे आणि नागरिक या सर्वांनी आपापली जबाबदारी प्रामाणिकपणे पार पाडली, तरच लोकशाही अधिक सक्षम होईल.आज संविधान दिनाच्या निमित्ताने आपण स्वतःला एक महत्त्वाचा प्रश्न विचारला पाहिजे की, संविधानाने दिलेली समानता, स्वातंत्र्य आणि न्यायाची हमी आपल्या सामाजिक व्यवहारात कितपत उतरली आहे? समाजातील प्रत्येक व्यक्तीला सन्मानाने जगण्याची संधी मिळते आहे का? स्त्रिया, बालके, वृद्ध, दिव्यांग, आदिवासी, अनुसूचित जाती-जमाती आणि इतर वंचित घटकांना विकासाच्या मुख्य प्रवाहात समान स्थान मिळते आहे का? मतभिन्नतेचा आदर, सामाजिक सहिष्णुता आणि बंधुभाव आपल्या सार्वजनिक जीवनात दिसून येतो का? या प्रश्नांची प्रामाणिक उत्तरे शोधणे आवश्यक आहे. संविधानाचे यश केवळ शासनाच्या कामगिरीवर अवलंबून नसून नागरिकांच्या सामाजिक जाणीवेवर आणि सामूहिक जबाबदारीवरही अवलंबून आहे. कायद्याचा आदर, विवेकशील विचार, सामाजिक संवेदनशीलता आणि सार्वजनिक जीवनातील प्रामाणिकपणा या गुणांचा विकास करणे काळाची गरज आहे.भारतीय संविधानाने प्रत्येक नागरिकाला समान प्रतिष्ठेने जगण्याचा अधिकार दिला आहे आणि त्याच वेळी राष्ट्राच्या प्रगतीमध्ये योगदान देण्याची जबाबदारीही सोपवली आहे. सामाजिक विषमता दूर करून, आर्थिक न्याय प्रस्थापित करून, स्त्री-पुरुष समानता निर्माण करून आणि विविधतेचा आदर राखूनच संविधानातील आदर्श प्रत्यक्षात उतरवता येतील. लोकशाही ही केवळ संसद, निवडणुका आणि शासनसंस्थांपुरती मर्यादित नसून ती कुटुंब, समाज, शैक्षणिक संस्था आणि सार्वजनिक जीवनातील व्यवहारांमध्येही प्रतिबिंबित झाली पाहिजे. प्रत्येक व्यक्तीने दुसऱ्याच्या स्वातंत्र्याचा आदर केला, भेदभाव टाळला आणि सामाजिक न्यायासाठी योगदान दिले, तरच संविधानाची मूल्ये समाजाच्या तळागाळापर्यंत पोहोचतील.संविधान दिन हा आपल्या राष्ट्रीय जीवनातील मूल्यांची पुनर्स्थापना करण्याचा दिवस आहे. भारतीय संविधानाने आपल्याला केवळ अधिकार दिले नाहीत, तर एक जबाबदार, समताधिष्ठित, न्यायप्रिय आणि बंधुभावाने नटलेला समाज घडविण्याची दिशाही दिली आहे. संविधानाचे सामर्थ्य त्याच्या पानांमध्ये नसून ते प्रत्यक्ष जीवनात किती प्रभावीपणे अमलात आणले जाते, यामध्ये आहे. त्यामुळे संविधानाचा आदर करणे म्हणजे केवळ त्याचे वाचन किंवा पूजन करणे नव्हे, तर त्यातील मूल्ये आपल्या विचारांत, कृतीत आणि सामाजिक व्यवहारात रुजविणे होय. स्वातंत्र्य, समता, न्याय आणि बंधुता या मूल्यांवर आधारित भारताची निर्मिती करण्यासाठी प्रत्येक नागरिकाने सजग राहणे आवश्यक आहे. संविधानाचे रक्षण करणे ही केवळ शासनसंस्थांची जबाबदारी नसून ती प्रत्येक भारतीयाची सामूहिक जबाबदारी आहे. संविधानातील मूल्यांचा जागर आणि लोकशाहीप्रती निष्ठा हाच सशक्त, समृद्ध, सर्वसमावेशक आणि न्यायपूर्ण भारताच्या निर्मितीचा खरा मार्ग आहे.

डॉ. राजेंद्र बगाटे, (लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)

bagate.rajendra5@gmail.com

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार २५ नोव्हेंबर २०२६

आरक्षण, घटनात्मक मूल्ये आणि प्रशासकीय अधिकाऱ्यांची सामाजिक जबाबदारी



आयएएस अधिकारी तुकाराम मुंढे यांच्या प्रशासकीय कार्यक्षमतेची आणि धडाडीची अलीकडच्या काळात मोठ्या प्रमाणावर चर्चा होत आहे. अन्न व औषध प्रशासनातील त्यांच्या कामगिरीमुळे अनेकांच्या मनात त्यांच्याविषयी आदर निर्माण झाला आहे. प्रशासनातील अनियमितता आणि निष्क्रियतेविरुद्ध त्यांनी घेतलेली भूमिका निश्चितच कौतुकास्पद आहे. मात्र, पुण्यातील एका कार्यक्रमात आरक्षणासंदर्भात त्यांनी केलेले भाषण सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत असून, त्यातील काही विधानांमुळे गंभीर वैचारिक प्रश्न उपस्थित झाले आहेत.उपलब्ध दृश्यफितीतील त्यांच्या विधानानुसार, एका पिढीने आरक्षणाचा लाभ घेऊन शिक्षण आणि नोकरीच्या माध्यमातून प्रगती केली, तर पुढील पिढीला पुन्हा आरक्षणाचा लाभ मिळण्याची आवश्यकता नाही, अशी भूमिका त्यांनी मांडल्याचे दिसते. मात्र, भाषणाची संपूर्ण ध्वनिचित्रफीत उपलब्ध नसल्याने त्यांच्या विधानांचा पूर्ण संदर्भ समजून घेणे आवश्यक आहे. त्यांच्या भाषणातील समताधिष्ठित समाजनिर्मितीचे आवाहन स्वागतार्ह असले, तरी एका पिढीच्या प्रगतीनंतर पुढील पिढीला आरक्षणाची गरज उरत नाही, हा विचार चिकित्सेचा विषय आहे.आरक्षणाच्या दहा वर्षांच्या कालमर्यादेचा संदर्भमुंढे साहेबांनी भाषणात आरक्षणासाठी दहा वर्षांचा कालावधी निश्चित करण्यात आला होता, असा संदर्भ दिल्याचे दिसते. मात्र, भारतीय संविधानातील राजकीय आरक्षण आणि शिक्षण व सरकारी नोकऱ्यांमधील आरक्षण या स्वतंत्र तरतुदी आहेत. संविधानाच्या अनुच्छेद ३३४ मध्ये लोकसभा आणि राज्यांच्या विधानसभांमधील अनुसूचित जाती-जमातींच्या राजकीय प्रतिनिधित्वासाठी सुरुवातीला दहा वर्षांची कालमर्यादा निश्चित करण्यात आली होती. पुढे घटनादुरुस्त्यांद्वारे ती वाढविण्यात आली.मात्र, शिक्षण आणि सरकारी नोकऱ्यांमधील आरक्षणासाठी संविधानात अशी दहा वर्षांची समाप्ती तारीख निश्चित करण्यात आलेली नाही. अनुच्छेद १५(४), १५(५) आणि १६(४) या तरतुदी सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास समूहांच्या प्रगतीसाठी आणि सार्वजनिक सेवांमधील प्रतिनिधित्वासाठी विशेष उपाययोजनांना आधार देतात. त्यामुळे राजकीय आरक्षणाची दहा वर्षांची तरतूद आणि शिक्षण व नोकऱ्यांमधील आरक्षण यांची सरसकट गल्लत करणे योग्य नाही.डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी वंचित समूहांच्या राजकीय प्रतिनिधित्वासाठी स्वतंत्र मतदारसंघांची मागणी केली होती. पुणे करारानंतर संयुक्त मतदारसंघात अनुसूचित जातींसाठी राखीव जागांची व्यवस्था स्वीकारण्यात आली. त्यामुळे बाबासाहेबांच्या राजकीय प्रतिनिधित्वविषयक भूमिकेचा विचारही ऐतिहासिक संदर्भासह करणे आवश्यक आहे.आरक्षण ही सवलत नव्हे, सामाजिक न्यायाची व्यवस्थाआरक्षणाकडे केवळ आर्थिक मदत किंवा विशेष सवलत म्हणून पाहणे ही मूलभूत चूक आहे. भारतीय जातिव्यवस्थेने काही समूहांना शतकानुशतके शिक्षण, ज्ञान, संपत्ती, सामाजिक प्रतिष्ठा आणि सत्तेच्या प्रक्रियेपासून दूर ठेवले. ही वंचितता केवळ आर्थिक नव्हती; ती सामाजिक संरचनेचा भाग होती. काही समूहांना पिढ्यान्पिढ्या विशेषाधिकार मिळाले, तर काही समूहांना सामाजिक बहिष्करण आणि अपमान सहन करावा लागला.अशा ऐतिहासिक विषमतेच्या पार्श्वभूमीवर सर्वांना समान संधी दिल्याची घोषणा पुरेशी ठरत नाही. कारण सर्वांची सुरुवातीची सामाजिक परिस्थिती समान नाही. आरक्षण ही ऐतिहासिकदृष्ट्या वंचित समूहांना सार्वजनिक संस्था, शिक्षणव्यवस्था आणि प्रशासनात प्रतिनिधित्व मिळवून देणारी घटनात्मक व्यवस्था आहे. त्यामुळे आरक्षणाचा प्रश्न केवळ एखाद्या व्यक्तीला प्रवेश किंवा नोकरी मिळण्यापुरता मर्यादित नाही; तर सार्वजनिक जीवनातील प्रतिनिधित्व आणि सामाजिक न्यायाशी संबंधित आहे.एका पिढीची प्रगती म्हणजे जातीय विषमतेचा अंत नव्हेसमजा, एखाद्या दलित कुटुंबातील पहिल्या पिढीतील व्यक्तीला आरक्षणामुळे शिक्षणाची संधी मिळाली आणि ती सरकारी अधिकारी झाली. तिची आर्थिक परिस्थिती सुधारली, कुटुंबाला स्थैर्य प्राप्त झाले आणि सामाजिक प्रतिष्ठाही वाढली. ही निश्चितच सकारात्मक बाब आहे. परंतु, त्यामुळे त्या व्यक्तीची जातीय ओळख संपते का? तिच्या पुढील पिढीला जातीय पूर्वग्रह आणि भेदभावाचा सामना करावा लागणार नाही, याची हमी कोण देणार?शिक्षण, नोकरी आणि आर्थिक संपन्नता यामुळे जीवनमान सुधारू शकते; परंतु समाजातील जातीय मानसिकता आपोआप नष्ट होत नाही. विवाहसंस्था, सामाजिक संबंध, शैक्षणिक संस्था, रोजगार आणि सार्वजनिक जीवनात जातीय पूर्वग्रहांचे अस्तित्व आजही दिसून येते. त्यामुळे एका पिढीचे आर्थिक किंवा शैक्षणिक उन्नयन म्हणजे संपूर्ण कुटुंबाची सामाजिक समानता प्रस्थापित झाली, असा निष्कर्ष काढता येणार नाही.समताधिष्ठित समाजनिर्मिती एवढी सोपी आहे का?मुंढे साहेबांनी आधुनिक पिढीने समताधिष्ठित समाजनिर्मितीसाठी प्रयत्न करावेत, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे. ही भूमिका निश्चितच स्वागतार्ह आहे. मात्र, समताधिष्ठित समाज निर्माण करणे एवढे सोपे आहे का? केवळ एका पिढीला आरक्षणाचा लाभ देऊन आणि पुढील पिढीला त्यापासून दूर ठेवून सामाजिक समानता निर्माण होऊ शकते का?समता ही केवळ कायदेशीर किंवा आर्थिक संकल्पना नाही. ती सामाजिक संबंधांत, सांस्कृतिक व्यवहारांत, शैक्षणिक संस्थांत आणि दैनंदिन जीवनात प्रत्यक्ष उतरावी लागते. अस्पृश्यता, जातीय श्रेष्ठ-कनिष्ठता, सामाजिक बहिष्कार आणि भेदभाव नष्ट झाल्याशिवाय वास्तविक समानता निर्माण होऊ शकत नाही. ही जबाबदारी केवळ आरक्षणाचा लाभ घेणाऱ्या समूहांची नसून संपूर्ण समाजाची आहे.आधुनिकता, शिक्षण, औद्योगिकीकरण, नागरीकरण आणि तंत्रज्ञानाचा विस्तार झाला असला तरी भारतीय समाजातून जातिव्यवस्था संपलेली नाही. ग्रामीण भागातील जातीय बहिष्कार, आंतरजातीय विवाहांना होणारा विरोध, शैक्षणिक संस्थांमधील भेदभाव, जातीय अत्याचार आणि सामाजिक माध्यमांवरील जातीय द्वेषपूर्ण अभिव्यक्ती ही त्याची उदाहरणे आहेत. जातिव्यवस्थेने आपले स्वरूप बदलले असले, तरी तिचे अस्तित्व कायम आहे.म्हणूनच मुंढे साहेबांनी भारतीय समाजशास्त्राचा, विशेषतः जातिव्यवस्थेचा आणि तिच्या समकालीन स्वरूपाचा अधिक सखोल अभ्यास करणे आवश्यक आहे. समाजशास्त्र आपल्याला सांगते की सामाजिक संरचना केवळ व्यक्तीच्या इच्छेने बदलत नाहीत. त्यामागे इतिहास, सत्ता, सामाजिक संबंध आणि संसाधनांचे असमान वितरण कार्यरत असते. त्यामुळे जातीय विषमता दूर करण्यासाठी समाजाच्या मानसिकतेत आणि संस्थात्मक रचनेत परिवर्तन घडवावे लागते.प्रशासकीय अधिकाऱ्यांची घटनात्मक जबाबदारीआरक्षण व्यवस्थेतील त्रुटी, लाभांचे असमान वितरण आणि अंमलबजावणीतील अडचणी यांवर चर्चा होणे आवश्यकच आहे. आरक्षित प्रवर्गांतील अंतर्गत असमानतेचाही अभ्यास व्हायला हवा. मात्र, अशा चर्चेच्या निमित्ताने आरक्षणाच्या मूळ घटनात्मक उद्देशाकडे दुर्लक्ष होता कामा नये. धोरणाच्या अंमलबजावणीत सुधारणा सुचविणे आणि त्या धोरणाची घटनात्मक गरजच संपली आहे, असे गृहीत धरणे या दोन भिन्न गोष्टी आहेत.आयएएस अधिकारी हा केवळ प्रशासकीय निर्णय घेणारा घटक नसतो, तर संविधानातील मूल्यांची अंमलबजावणी करणाऱ्या व्यवस्थेचा महत्त्वाचा भाग असतो. त्यामुळे सामाजिक न्याय, आरक्षण आणि जातीय विषमता यांसारख्या विषयांवर त्याने केलेली विधाने अभ्यासपूर्ण आणि घटनात्मक संदर्भांवर आधारित असणे अपेक्षित आहे. प्रशासकीय कार्यक्षमता जितकी महत्त्वाची आहे, तितकीच सामाजिक संवेदनशीलताही महत्त्वाची आहे.समतेच्या दिशेने प्रवास अद्याप अपूर्णमुंढे साहेबांच्या प्रशासकीय कामगिरीचे कौतुक करणे आणि त्यांच्या आरक्षणविषयक विधानांची चिकित्सा करणे या परस्परविरोधी गोष्टी नाहीत. लोकशाहीत व्यक्तीच्या कामगिरीचे कौतुक करण्याबरोबरच तिच्या विचारांशी असहमती व्यक्त करण्याचाही अधिकार प्रत्येकाला आहे.आजही भारतीय समाजात जातीय उतरंड अस्तित्वात असेल, सामाजिक प्रतिष्ठेचे वितरण असमान असेल आणि वंचित समूहांना भेदभावाचा सामना करावा लागत असेल, तर आरक्षणाची आवश्यकता संपली आहे, असा निष्कर्ष कसा काढता येईल? एका पिढीची प्रगती निश्चितच स्वागतार्ह आहे; मात्र ती सामाजिक समतेचा अंतिम टप्पा नाही.शेवटी, मुंढे साहेबांना एक प्रश्न विचारावासा वाटतो : भारतीय समाजात अजून वास्तविक समानता प्रस्थापित झालेली नाही, हे आपण मान्य करता; मग त्या समानतेच्या दिशेने सुरू असलेल्या घटनात्मक प्रयत्नांपैकी एक महत्त्वाचा प्रयत्न असलेल्या आरक्षणाची आवश्यकता केवळ एका पिढीच्या प्रगतीवरून कशी संपुष्टात येऊ शकते?डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेला संविधानाचा वारसा केवळ त्यांच्या विचारांचा गौरव करण्यात नाही, तर समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि सामाजिक न्याय ही मूल्ये आचरणात आणण्यात आहे. एका पिढीची प्रगती महत्त्वाची आहे; परंतु त्या प्रगतीला सामाजिक समतेचा अंतिम टप्पा समजणे हीच खरी वैचारिक चूक ठरेल.

प्रा. डॉ. प्रियदर्शन भवरे, जालना

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002